दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३३४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, मंगळवार, दि.१५ जुलै २०२५

"ज्या दिवशी आपले विचार मोठे होतील, त्या दिवशी मोठे मोठे लोक आपला विचार सुरू करतील.."

## राज ठाकरेंनी सस्पेन्स वाढवला ! म्हणाले... त्यानंतर युतीचं बघू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, नाशिक :** ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आठवडा होऊन गेला आहे. गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरु आहेत. प्राथमिक शाळेतील हिंदी सक्तीवरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे सरकारला याबद्दलचा जीआर निर्णय रद्द करावा लागला. त्यानंतर दोन्ही ठाकरेंनी ५ जुलैला मुंबईत विजयी मेळावा घेतला. यानंतर राज ठाकरेंनी त्यांच्या नेत्यांना युतीसंदर्भात काहीही बोलण्यास मनाई केली. त्यानंतर आता राज ठाकरे नाशिकमध्ये पत्रकारांशी यासंदर्भात बोलले आहेत. अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी युतीबद्दलची भूमिका स्पष्ट केली.



मुंबईच्या वरळीत ५ जुलैला झालेल्या विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही. तो मेळावा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, असं राज ठाकरे पत्रकारांसोबत अनौपचारिक गप्पा मारताना म्हणाले. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत युतीचा निर्णय घेऊ, असं म्हणत त्यांनी युतीचा सस्पेन्स वाढवला. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत परिस्थिती पाहू आणि त्यानंतर निर्णय घेऊ, असं राज ठाकरेंनी पत्रकारांना सांगितलं. मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी राज ठाकरे सध्या इगतपुरीत आहे. या शिबिराचा आजचा पहिला दिवस आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारनं काढलेल्या हिंदी सक्तीच्या जीआरबद्दलदेखील राज ठाकरे सविस्तर बोलले. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंचाही उल्लेख केला. हिंदी सक्तीचा अहवाल ठाकरे यांच्याच सरकारनं स्वीकारल्याची टीका भाजप, शिंदेसेनेकडून करण्यात येते. त्यावर बोलताना राज यांनी सगळ्या गोष्टी मुद्देसूद मांडल्या. त्यातून त्यांनी एकप्रकारे त्यांचे चुलतबंधू उद्धव ठाकरे यांची बाजू ठामपणे मांडल्याचं दिसलं.

'मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारनं हिंदी सक्तीचा शासन निर्णय काढला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी केवळ केंद्र सरकारच्या समितीचा अहवाल स्वीकारला होता. त्या अहवालाची अंमलबजावणी ठाकरेंच्या नेतृत्त्वातील सरकारनं केलेली नव्हती,' अशा शब्दांत राज ठाकरेंनी जीआरची क्रोनोलॉजी सांगितली.

राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबतच्या युतीबद्दलचा निर्णय नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत घेऊ, असं स्पष्टपणे सांगितले. त्याआधी आज विधिमंडळाच्या आवारात पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनीदेखील युतीच्या प्रश्नावर अशाच स्वरुपाचं उत्तर दिलं. आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू देत. मग युतीचं बघू, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

## गटविकास अधिकारी परीट यांच्या गैर कारभाराचा निषेध करत धावडी सदस्यांचे सामूहिक राजीनामे

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१४, वाई (सातारा) :** धावडी तालुका वाई येथील माजी उपसरपंच अनिल मांढरे यांच्यावर वाई पंचायत समिती गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांच्या तक्रारीनुसार पुणे आयुक्तांनी शासकीय कामात अडथळा केला म्हणून अनिल मांढरे यांचे सदस्य पदावर निलंबनाची कारवाई केली.

वाई तालुक्यात खेड्यापाड्याचा सर्वांगीण विकास करण्याऐवजी गटविकास अधिकारी व्यक्तिगत आकसापोटी मांढरे यांच्यावर अन्यायकारक कारवाई केली. शेजारील गुंडेवाडी गावात पाणी देण्यास आमचा विरोध नाही. पण जबरदस्तीने निर्णय देणे योग्य वाटत नाही. अधिकाऱ्यांनी २७ लाखांची धावडी गावची विकास कामे रखडवली व उपसरपंचावर निलंबनाची कारवाई केल्याचे निषेधार्थ धावडी ग्रामस्थांनी वाई शहरातून मोर्चाने येऊन गटविकास अधिकारी यांचा जाहीर निषेध नोंदवून सर्व सदस्यांनी राजीनामा देत असल्याचे बाजार समितीचे माजी संचालक विलास मांढरे यांनी जाहीर करून गटविकास अधिकारी यांच्याकडे सर्व सदस्यांनी राजीनामे सादर केले.




एखाद्या ग्रामपंचायतीने मोर्चा आणि येऊन राजीनामा देण्याची वाई तालुक्यातील हा पहिलाच प्रसंग चर्चेचा विषय ठरला होता. धावडी गावच्या मोर्चात सरपंच वनिता ननावरे, उपसरपंच पल्लवी मांढरे, सीमा मांढरे, गणेश मांढरे, महेंद्र गंगावणे, सागर मांढरे, भय्या धुमाळ, अनिल मांढरे, प्रशांत मांढरे, सचिन मांढरे, संजय मांढरे, राहुल मांढरे, परशुराम मांढरे, रुपेश खंडागळे, स्वप्निल खंडागळे, समाधान खंडागळे, माजी सरपंच सतीश मांढरे, मनोहर मांढरे, धोंडीबा मांढरे, प्रमोद मांढरे, सुधीर मांढरे, कुंडलिक मांढरे, बाबू निंबाळकर, बाबू पवार व बहुसंख्य महिला मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

## चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीवर डोंबिवली पोलिसांची झडप ! ५.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१४, डोंबिवली :** डोंबिवली परिसरात मॉर्निंग वॉक करत असलेल्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने लुटणाऱ्या एका आरोपीला डोंबिवली पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ५.५५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीने एकूण तीन गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

कल्याण-डोंबिवली परिसरात गेल्या काही दिवसांपासून सकाळी फिरायला निघालेल्या महिलांच्या गळ्यातील चेन खेचून पळून जाण्याच्या घटना वाढत होत्या. हे गुन्हे रोखण्यासाठी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली पोलिसांनी विशेष अँटी चेन स्नॅचिंग पथक तयार करून पेट्रोलिंग व नाकाबंदीचे आयोजन केले होते.

पोलिसांनी १७२ सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासून, तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी परेश किशोर घावरी (वय ३५, रा. कल्याण पश्चिम) याला



ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्याने खालीलप्रमाणे गुन्ह्यांची कबुली दिली:

१. गु.रजि.नं. ५५१/२०२५ – डोंबिवली पो. ठा.
(कलम ३०९(६), ३(५))
२. गु.रजि.नं. ५०४/२०२५ – डोंबिवली पो. ठा.
(कलम ३०४(२), ३(५))
३. गु.रजि.नं. ५४८/२०२५ – मध्यवर्ती पो.ठा.
(कलम ३०४(२), ३(५))

**: जप्त मुद्देमाल :**

२० ग्रॅम सोन्याची चेन – ₹१,८०,०००/-
१० ग्रॅम सोन्याची चेन – ₹९०,०००/-
पल्सर मोटारसायकल (MH-05/FS-9656) – ₹१,१५,०००/-
यामाहा स्कूटर (MH-05/FY-1470) – ₹१,७०,०००/-
एकूण किंमत : ₹५,५५,०००/-

गुन्ह्यांचा तपास डोंबिवली पोलीस तपास पथक करत असून, ही कामगिरी मा. पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त, अपर आयुक्त व उप आयुक्त ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड व त्यांच्या टीमने केली आहे.पोलीसांनी या तपासात उल्लेखनीय तांत्रिक कौशल्य दाखवत गुन्हेगाराला गजाआड केले असून, नागरिकांनी सतर्क राहावे व संशयित व्यक्ती अथवा घटना दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संभाजी ब्रिगेडचे नेते गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्यांचा बिलोलीत निषेध

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१४, नांदेड :** राजमाता जिजाऊ, शाहु फुले, आंबेडकर, बहुजन विचार धारेचे तथा संभाजी ब्रिगेडचे नेते प्रविणदादा गायकवाड यांच्यावर काल दि.१३ जुलै रविवार रोजी आक्कलकोट जि.सोलापुर येथे दिपक काटे व त्यांचे साथीदारांनी जिव घेणे केलेल्या भ्याड हल्ल्यांचा तालुका बिलोली सकल मराठा समाज,संभाजी ब्रिगेड व बहुजन समाजाच्या वतिने जाहीर निषेध करण्यात आला असुन



सदरील हल्लेखोरावर तात्काळ कठोरात कठोर कार्यवाही करुन अटक करावी अन्यथा येत्या काळात तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा एक निवेदनाद्वारे तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे देण्यात आले. सदर निवेदनाची प्रत पोलीस निरीक्षक बिलोली अतुल भोसले यांना देण्यात आली. या निवेदनावर राजु पा.शिंपाळकर, दिलीप पांढरे, पांडुरंग रामपुरे, शंकर व्यंकम, श्रीनिवास पा.शिंदे, चक्रधर पा.टेकाळे, हाणमंत पा. कदम, केदार पा.ढगे, सय्यद रियाज, आनंदराव जाधव, देवराव शिंदे, रवि पा.जाधव, आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले.

## थोडक्यात

### सोलापूर जिल्हा ग्रामीणमध्ये मनाई आदेश लागू

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१४, सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून १३जुलै २०२५ ते २७ जुलै २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७(३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

### दिव्यांग, जेष्ठांना मिळणार कृत्रिम साहित्य, शिबीराचा लाभ घ्या : खा.बजरंग सोनवणे

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१४, केज (बीड) :** बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१८ ते ३०जुलै २०२५ या कालावधीमध्ये पूर्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबीरात दिव्यांग, जेष्ठांनी लाभ घ्यावा, असे अवाहन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकींग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर, काठया, चष्मे, कृत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटपाच्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या-त्या तालुक्यातील पंचायतसमिती मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील केज येथे सदर शिबीराचे उद्घाटन दि.१८ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा मतदार संघ यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. तालुकास्तरावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शिबीर असेल, अशी माहिती एस.एन.मेश्राम-जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी दिली आहे. दरम्यान, या शिबीरात साहित्याचा लाभ घ्यावा, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

दिव्याग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत, व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, वार्षीक उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे. अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.

### मस्ती महागात! तरुणाची चोरीची मजा थेट तुरुंगात



**अक्षराज : प्रनिल कुसाळे**

**दि.१४, येरवडा (पुणे) :** दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांवर अंकुश आणण्यासाठी येरवडा पोलिसांनी निर्णायक कारवाई करत एक संशयित चोरट्या मुसक्या आवळल्या आहेत. गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीकडून दोन चोरीच्या दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

मुसेफ अखिल शेख (वय १९, रा. सेवक चौक, लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. मौजमजा करण्यासाठी त्याने दुचाकी चोरल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून सुमारे ₹६०,००० किमतीच्या दोन दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलीस कर्मचारी बालाजी सोंगे व भीमराव कांबळे यांनी मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे केली. पुढील कारवाई पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ सोमय्या मुंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे पुढील तपास करत आहे. येरवडा पोलिसांची ही तत्परता निश्चितच कौतुकास्पद आहे.

अक्षराज


# संपादकीय



## महाराष्ट्राचा विवेकी आवाज

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# धीर धर माणसा, येतील तुझे ही चांगले दिवस!

आजकाल माणसात जरासा ही संयम राहिला नाही. माणूस अविचारी, अधीर, तापट व चिडक्या स्वभावाचा झाला आहे. त्याच्या अशा स्वभावामुळे त्याला जीवनात आलेले अपयश पचवणे अवघड झाले आहे. आलेल्या अपयशावर, संकटावर व अडचणीवर हिंमतीने मात न करता, तो मनातून व आतून पूर्णपणे खचून जात आहे, आणि स्वतःची जीवन यात्रा संपवण्याचा विचार करत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या व कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत.

रोज शेतकरी आत्महत्येची व विद्यार्थी आत्महत्येची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळते. ही समस्त भारतीयांसाठी चिंताजनक व खेदजनक बाब आहे. शाळेतील व कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या वाट्याला अपयश आले तर बहुतांश विद्यार्थी कोणताच मागचा पुढचा विचार न करता आणि थोडासा देखील संयम न बाळगता थेट टोकाचा निर्णय घेऊन स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. त्यांना वाटत असते की, माझ्या वाट्याला आलेले अपयश हे माझी सामाजिक प्रतिष्ठा कमी करणारे आहे. माझ्या शिक्षणावर वारेमाप खर्च करणारे माझे आईवडील मला काय म्हणतील? गावकरी, समाज बांधव व मित्रपरिवार मला काय म्हणेल? मला गावकऱ्यांना तोंड दाखवायला जागा शिल्लक आहे का? आता लोक मला खूप चिडवतील, माझी थट्टा मस्करी करतील आणि मला टोमणे मारतील, असे अनेक वेगवेगळे विचार विद्यार्थ्यांच्या मनात थैमान घालू लागतात. आणि यांना घाबरून हे अविवेकी व अविचारी विद्यार्थी स्वतःला मृत्यूच्या खाईत लोटतात. असला अविचारी व अविवेकीपणा काय कामाचा? अपयशावर आत्महत्या हा पर्याय ठरूच शकत नाही.

यशाला काबीज करायचे असेल तर अपयशाच्या वाटेने प्रवास करावा लागतो. आजपर्यंत जे कोणी विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात यशस्वी झालेत, त्यांच्या वाट्याला एकदा तरी अपयश आलेलेच असते. माणसाला अपयश हे आणखीन जोमाने अभ्यास करण्यासाठी प्रेरणा देणारे असते. हे आमच्या



विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यायला हवे. शेतकऱ्यांचा विचार केला तर सध्या महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे निदर्शनास येत आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे एक प्रकारे रास्त आहे. असे काही

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जि.लातूर**

जणांना वाटत असेल. कारण शेतकरी सध्या निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. बरोबर मग नक्षत्रात पेरणी करून सुद्धा पाऊस वेळेवर पडत नाही. त्यामुळे शेतात पेरलेले काही उगवत नाही.आणि कसेबसे उगवले तर पूर्ण अतिवृष्टीच होते. त्यामुळे उगवलेले पीक हे सगळे भुईसपाट व जमीन दोस्त होते. म्हणजे शेतकऱ्यांच्या नशिबी एक तर दुष्काळ असतो नाहीतर अतिवृष्टी. पावसाने चांगली साथ दिली आणि पिकांची रास चांगली निघाली तर सरकार त्याला हमीभाव देत नाही. नाविलाजाने शेतकऱ्यांना आपला माल कवडीमोल भावाने विकावा लागतो. अगोदरच सावकाराचे कर्ज काढून पेरणीला पैसा लावलेला असतो. घरातील मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न आणि घर प्रपंचाला लागणारा पैसा यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले असतात. शासन मात्र शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घ्यायला तयार नसतो. शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची दखल घ्यायला तयार नसतो. यामुळे शेतकरी भयभीत व चिंतातूर अवस्थेत असतात.आतून पूर्णपणे खचून जातात, त्यांना आर्थिक टंचाईचा सामना करणे झेपत नसल्यामुळे ते नैराश्यात जाऊन आत्महत्या करतात. सध्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी प्रचंड वाढली आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे योग्य तर नाहीच पण माणूस मनाच्या पुढे जाऊ शकत नाही. माणसाचे मन बदलल्यावर माणूस कोणत्याही थराला जाऊन काहीही करू शकतो. पण मला वाटते की, शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करण्यापेक्षा त्याचा हिंमतीने मुकाबला करावा.

माणसाला जीवन हे बार बार मिळत नसते. आपण जरी मरायचे नको म्हटले तरी, एक दिवस आपल्याला मरण हे येणारच आहे. मरण हे न टळणारी बाब आहे. ते कोणाच्याच बापाला चुकत नाही. स्वतःच्या हाताने मरण्यापेक्षा कधीही नैसर्गिक मृत्यू हा चांगला असतो. शेतकऱ्यांनो, आतून खचून जाण्यापेक्षा, कोणताच मानसिक ताण घेण्यापेक्षा, आलेल्या संकटावर हिंमतीने मात करा. आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या मुलांचा व आपल्या पत्नीचा विचार करा... काही दिवस निश्चिंत रहा... सगळेच दिवस सारखे नसतात..माणसाच्या जीवनाला कधी कलाटणी मिळेल हे सांगता येत नाही.

अशा वेळी मनावर संयम ठेवा.. काही तरुण-तरुणी खूप वय वाढल्यामुळे, एक तर वेळेवर लग्नही जुळत नाही आणि नोकरी पण लागत नाही, आता किती दिवस आई-वडिलांच्या जीवावर शिक्षण शिकायचे व बसून खायचे, कुठवर लोकांचे टोमणे ऐकायचे, म्हातारपणापर्यंत नुसते शिकतच राहायचे का? आपली लग्नाची वयोमर्यादा संपल्यामुळे आता आपल्याला कोणी मुलगी पण द्यायला तयार नाही. यामुळे त्यांना स्वतःलाच स्वतःची लाज वाटत असते. त्यांना स्वतःचा कमीपणा वाटतो. आपल्याला लोक काय म्हणत असतील? याची भीती त्यांना अस्वस्थ करत असते...त्यांना प्रचंड मानसिक ताण येतो...आपण जगावे का मरावे? हा प्रश्न निर्माण होतो, काहीजण कमकुवत काळजाचे तरुण तरुणी आत्महत्या करून आपले जीवन संपवतात.

तर काही जिगरबाज तरुण-तरुणी हिंमत धरून व संयम ठेवून अभ्यास करतात. आणि स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन मोठ्या पदावर विराजमान होतात. आणि लग्नाला त्यांच्या मागे मुलींची लाईन लागते. हे सत्य आपण कुठेतरी पाहिलंच असेल. जे अपयशाला घाबरून माघार घेतात त्यांना यश कधीच मिळत नाही. पण जे अपयशाला न घाबरता हिंमतबाज बनून सातत्याने प्रयत्न करतात ते जीवनात नक्कीच यशस्वी होतात. म्हणून अपयशाला घाबरून आत्महत्या करण्यापेक्षा त्यावर हिंमतीने व सातत्याने मात करा...यश तुमच्यापुढे चालून येईल... फक्त जिद्द, संयम, चिकाटी व हिंमत बाळगून पुढील वाटचाल करायला हवी. फक्त धीर धर माणसा एक दिवस येतील तुझेही चांगले दिवस. हे वाक्य कायम आपल्या मनात ठेवा.

# धाराशिव नगरपालिकेसमोर लावलेला नवा गेट ठरत आहे नागरिक व वाहनधारकांसाठी डोकेदुखी



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१४, धाराशिव :** शहरातील धाराशिव नगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर नुकतेच लावण्यात आलेल्या लोखंडी गेटमुळे नागरिकांना आणि वाहनधारकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

नवीन गेट बसवल्यामुळे पालिकेत येणाऱ्या लोकांसाठी मुख्य रस्ता अडथळा निर्माण करणारा ठरत आहे. या गेटमुळे पालिकेच्या समोर वाहन उभे करणे जवळजवळ अशक्य झाले असून, कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना वाहन रस्त्यावरच लावावी लागत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताची शक्यता वाढली आहे.

नगरपालिका परिसरातील ही व्यवस्था पूर्णतः अकारण व नागरिकविरोधी आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. विशेषतः दिवसभरात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग व्यक्तींना या गेटमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

नगरपालिका प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता आणि नागरिकांचा अभिप्राय न घेता हा गेट बसविल्याचा प्रकार, प्रशासनाच्या दंडेलशाही वृत्तीचे दर्शन घडवत आहे.

नागरिकांनी मागणी केली आहे की, तत्काळ या गेटबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलना शिवाय पर्याय राहणार नाही.

# मोहा येथे संकल्प ते सिध्दी अभियानांतर्गत जनता दरबार उत्साहात संपन्न

**अक्षराज ; विकास वाघ**

**दि.१४, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील मोहा गावात जिल्ह्याचे नेते मित्रा उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील व जिल्हाध्यक्ष, दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली, मोदी सरकारचे ११ वर्ष 'संकल्प ते सिद्धी' या अभियानाअंतर्गत मोदी सरकारच्या यशस्वी वाटचाली निमित्त जिल्हा परिषद सदस्य, नेताजी आबा पाटील, कळंब पश्चिम मंडळ अध्यक्ष अरुण काका चौधरी, मोहा ग्रामपंचायत सदस्य, माजी तालुका सरचिटणीस, बालाजी मडके यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहा येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले.



नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी व शासकीय योजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जनता दरबाबाराचे आयोजन करण्यात आले होते.

या जनता दरबारात पीक विमा, निराधार निवृत्ती वेतन, श्रावण बाळ योजना, शेतकरी अनुदान, शेतरस्ते अशा विविध तक्रारी व समस्यांची नोंद झाली. यातील काही समस्यांचे निरसन तात्काळ करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये माजी सभापती धनंजय बप्पा वाघमारे, शेतकरी मोर्चा तालुका अध्यक्ष अशोक बप्पा मडके, मनोज साळूंखे, कांतीलाल धोंगडे सरपंच वाघोली, युवक नेते सचिन लोमटे तुगांव, बापूराव सावंत, गणेशजी देशमुख, संताजी वीर, सचिन वाघमारे, नानासाहेब यादव, बबलू शेख, हसन मुलांनी, बाबा कसबे, सुनिल भोंडवे, गावातील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनता दरबाराच्या माध्यमातून अनेक नागरिकांच्या तक्रारींना निवारण मिळाले असून, उर्वरित प्रकरणे संबंधित विभागाकडे पाठविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## सल्लागार..



अलिकडे पिसाळले
फेसाळलेसल्लागार
सल्ले देत फिरतात
भरगच्च भरे आगार

फुकट वाटती सल्ले
नकोआम्हांस पगार
पटो वा न पटो भले
सल्ले ऐका गप्पगार

कुठे काही खुट होई
चालू होतात एल्गार
विकलेजातात शब्द
चढ्याभावात भंगार

मध्येचं करती गायब
नेते अजब जादुगार
जंगजंग पछाडा तरी
सापडेना ते गुन्हेगार

सल्ल्यासोबत देतात
फुकटातकौतुकोद्गार
फुंकरघालून फुंकवी
शांत होणारा अंगार

उतू चालले ज्ञानसारे
खालीकरे कोशागार
हल्लेखोर परवडे ते
नको सल्लेखोर गार

खूप मिळे वेठबिगार
एकमागा घ्या हजार
कुणीतर आवरा अरे
सल्ला मास्टर बेजार

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# दिवा येथे उबाठा गटाचा मेळावा संपन्न; आगामी ठाणे मनपा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले






**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.१४, दिवा (ठाणे) :** महानगरपालिकेच्या ठाणे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने कंबर कसली असून कळवा, दिवा-मुंब्रा विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा दिवा येथील सुमित हॉल येथे पार पडला. यावेळी पक्षाचे स्थानिक नेते आणि महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेले उमेदवार उपस्थित होते.

या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक गुरुनाथ खोत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. ज्यामुळे मेळाव्याला उत्साहपूर्ण स्वरूप आले होते. मेळाव्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना कल्याण जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले की, ठाणे महानगरपालिका निवडणुकीत कल्याण लोकसभा मतदारसंघाचा भाग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल.

या भागातून जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा पक्षाचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. म्हात्रे यांनी पुढे असेही नमूद केले की, आगामी काळात दिवा शहरात शिंदे गटातील कार्यकर्ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील.

महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला अनुकूल वातावरण असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. हा मेळावा आगामी ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी पक्षाच्या तयारीचाच एक भाग मानला जात आहे. सदर कार्यकर्ता मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून गुरुनाथ खोत लोकसभा संपर्क प्रमुख कल्याण यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कल्याण लोकसभा सह संपर्क प्रमुख संतोष जाधव, कल्याण जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे, तात्या माने कल्याण जिल्हा संघटक, मृणाल यज्ञेश्वरी महिला जिल्हा संपर्क संघटिका, सुधीर पाटील कल्याण जिल्हा सचिव, उपजिल्हा प्रमुख विजय देसाई, रमेश पाटील, राहुल भगत, रोहिदास मुंडे, योगिता नाईक, पुष्पलता भानुशाली, ज्योती पाटील, कल्पना कावळे, शयना घडीयाल, चंद्रकांत विधाते राजेंद्र दहिबावकर, रवींद्र सुर्वे, वैकुंठ म्हात्रे उपस्थित होते. सदर कार्यकर्ता आणि पदाधिकारी मेळाव्याच आयोजन शहर प्रमुख दिवा सचिन पाटील, कळवा शहर प्रमुख लहू चाळके, मुंब्रा शहर प्रमुख विजय कदम यांनी केल होत. दिवा- मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी या मेळाव्यास उपस्थित होते.

# थोडक्यात

## समता परिषदेच्या पारनेर तालुकाध्यक्ष पदी नवनाथ खामकर



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पानोली येथील सामाजिक कार्यकर्ते नवनाथ बाबाजी खामकर यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. निवडीनंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच खामकर यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार समीर भुजबळ, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, मच्छिंद्र माळी, बबनराव घुमटकर, पत्रकार वसंत रांधवण, सुवर्णा धाडगे, किसनराव रासकर, खंडू भूकन, श्रीधर गाडीलकर, सचिन खामकर, शंकर रासकर, आकेश जमदाडे,पोपट काळोखे, दिलिप काळोखे, विजय मंडलिक, प्रभाकर घोलप, विशाल जमदाडे, अजित बोदगे, तन्मय खामकर, प्रसाद जमदाडे, अविनाश लोखंडे, विशाल क्षीरसागर, ओम क्षीरसागर, अशोक गायकवाड उपस्थित होते. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून समतेचा विचार गावागावात पोहचविणार आहे. यातून तरुणांसाठी लढा उभारणार असल्याचे खामकर यांनी बोलताना सांगितले. निवडीबद्दल खासदार निलेश लंके, निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र राजदेव, सरपंच संदिप गाडेकर, माजी सरपंच शिवाजी शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# चव्हाण विद्यालयात स्व.शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त गणवेश, शालेय साहित्य वाटप



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.१४, नागपूर :** केंद्रीय मंत्री व राज्याचे मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांची १०५ वी जयंती शंकरराव चव्हाण व कनिष्ठ महाविद्यालय व शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, नोटबुक, शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व भाजपा(काटोल) जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून म राविम कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव ईश्वर राऊत, जिल्हा उपाध्यक्ष किशोर चौधरी, प्रमोद गमे, बबलू ठाकूर, क्रिष्णा यादव, संध्या ठाकरे, यामिनी घोरमाडे, गणेश चिखले, किशोर बक्सरिया, सुनील जालंदर, विलास महल्ले, राजेश गायकवाड, जय तिवारी, मुख्याध्यापक विमलप्रकाश मिश्रा, मुख्याध्यापिका मनाली सूरकर, चंद्रकांत गायकवाड, आदि मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व द्वीप प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी नवनिर्वाचित भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे यांच्यासह इतर मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना निःशुल्क गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवाय महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक स्व. शंकरराव निंबाळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी रोख राशी देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना स्व. शंकरराव चव्हाण शिस्तप्रिय होते त्यामुळे त्यांना शिस्तीचे हेडमास्तर म्हणत होते. केंद्रीय मंत्री व राज्याचे मुख्यमंत्री असताना विकासाच्या दृष्टिकोनातून सिंचन विभागा अंतर्गत अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहे. शिवाय शिक्षण क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे स्व. शंकरराव चव्हाण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन विद्यार्थ्यांना कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलाश तभाने तर संचालन नीरज मिश्रा आभार गणेश चिखले यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता चंद्रकांत मोहड, प्रमोद इंगळे, नरेंद्र बुटोलिया, दिलदार रामटेके, संगीता राऊत, सुरेखा चिखले, पुष्पा बढिये, मनीषा सिंगनजुडे, गीता जालंदर, जिजा जैन, आशा कालसरपे, अभय मिश्रा, भोला बक्सरिया, किशोर निकोसे, शोभा घोडीले आदींनी सहकार्य केले.

## हर्णे बंदरासमोर बंदी असूनही अवैध मासेमारी; स्थानिक मच्छीमारांत तीव्र संताप



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**
**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** शासनाने १ जून ते ३० जुलै दरम्यान मासेमारीस बंदी घातली असताना देखील रायगड आणि मुंबई येथून आलेल्या हायस्पीड ट्रॉलर्सनी हर्णे बंदरासमोर बिनधास्त मासेमारी सुरू केल्याने स्थानिक मच्छीमारांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियम फक्त आम्हालाच का? असा प्रश्न उपस्थित करत स्थानिक मच्छीमारांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

मासेमारी बंदीचा कालावधी मासळीच्या प्रजननाचा काल आणि मान्सूनामुळे असलेल्या अस्थिर हवामानाचा विचार करून निश्चित करण्यात आला आहे. या काळात समुद्राला उधाण असते आणि मासळी किनारपट्टीकडे येते, त्यामुळे मासेमारीला बंदी असते. मात्र, यंदा शासनाच्या आदेशाची सर्रास पायमल्ली होत असून सुमारे १५ ट्रॉलर्स हर्णे बंदरासमोर ५ ते ६ नॉटिकल मैलाच्या आत मासेमारी करताना दिसून आल्या. यामुळे हर्णे पाजपंढरी परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. काही आठवड्यांपूर्वी अलिबागजवळ पाकिस्तानची नौका आढळल्याने सुरक्षेचा प्रश्न ही ऐरणीवर आला होता. शासनाचा ड्रोन अद्याप तैनात न झाल्यामुळे परिस्थितीची योग्य नोंद होऊ शकलेली नाही. स्थानिक मच्छीमारांनी मत्स्यव्यवसाय खात्याशी संपर्क करण्याचा वारंवार प्रयत्न केला, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. हर्णे बंदर कमिटीचे उपाध्यक्ष प्रकाश रघुवीर यांनी सांगितले की, आम्ही नियम पाळतो आणि आमच्या परिसरात बाहेरचे मासेमार बिनधास्त मासेमारी करतात. यंत्रणा निष्क्रिय आहे. यापुढे जर परिस्थिती अशीच राहिली, तर मच्छीमार कायदा हातात घेण्यास भाग पाडले जातील. स्थानिक मच्छीमार अनंत चोगले यांनी देखील शासन आणि प्रशासकीय यंत्रणांची निष्क्रियता लक्षात घेऊन संताप व्यक्त केला. आम्हालाच नियम लागू आणि बाहेरून आलेल्यांना मोकळे रान? आम्ही कुणाकडे पाहायचे? शासन कुठे आहे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणी तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी हर्णे परिसरातील मच्छीमार समाजातून होत आहे.

# लॉयन्स इन्फिनाईट फाऊंडेशन व लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट च्या वतीने शैक्षणिक साहित्य वितरण



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१४, चंद्रपूर :** दि.एज्युकेशन सोसायटी चंद्रपुर द्वारा संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय पांढरकवडा येथे प्राचार्या डॉ. शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११ जुलै २०२५ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व लॉयन्स इनफिनाइट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. शुक्ला मॅडम तसेच प्रमुख अतिथी म्हणून कौशिक घोष (जी.एम. एच.आर. लॉयड्स मेटल) विद्या पाल ( ए.जी.एम., एल.आय.एफ.), मुत्येलवार केंद्रप्रमुख यशवंतनगर, मुकेश भोयर (कॉर्डीनेटर एल.ओ.एल.टी.) अनुराग मत्ते (ऑफिसर एल. आय. एफ.), जेष्ठ शिक्षक वैरागडे, प्रा. संदिप गावंडे, प्रज्ञा पवार इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

जेष्ठ शिक्षक वैरागडे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातुन कार्यक्रमाची रूपरेषा व शाळेतील उपक्रमा बद्दल माहिती सांगितली. कौशिक घोष सरांनी विद्यार्थ्यांना सदैव मदत करण्याचे आश्वासन दिले. विद्या पाल यांनी विद्यार्थ्यांना या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर फायदा घेऊन चांगला अभ्यास करण्याचा उपदेश केला. मुत्येलवार यांनी विद्यार्थ्यांना यावर्षीच्या दहावीच्या परीक्षेविषयी मार्गदर्शन करतांना मोबाइलचा कमी वापर करून अभ्यासाकडे लक्ष देण्याविषयी मार्गदर्शन केले. भोयर यांनी शैक्षणिक साहित्याचा वापर करून चांगला अभ्यास करावा.

कारण विद्यार्थ्यांचा अभ्यास म्हणजेच त्यांची देशसेवा होय. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.शुक्ला यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देवु केल्याबद्दल लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व लॉयन्स इनफिनाइट फाऊंडेशन यांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांना या सेवाभावी संस्थे कडून होत असलेली मदत फार मोलाची आहे. कारण शाळेतील विद्यार्थी गरीब कुटुंबातुन येत असून शैक्षणिक साहित्याच्या अभावामुळे कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये. हा या कार्यक्रमाचा उद्देश. सर्व मान्यवरांच्या हस्ते वर्ग ८ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, १२ नोटबुक, कंपासपेटी, आलेख वही, ड्रॉइंग वही इत्यादी साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात पालकवर्गाची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साखरकर तर आभार प्रदर्शन येमुलवार यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. साहित्य मिळाल्याने सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक आनंदी दिसत होते.

## १०० दिवसाच्या कृती आराखडा अंतर्गत तक्रार निवारण दिनाचे आयोजन




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**
**दि.१३, ठाणे :** दिनांक १२ जुलै २०२५ रोजी व दिनांक १३ जुलै २०२५ रोजी ठाणे पोलीस आयुक्तालयात १०० दिवसाच्या कृती आराखडा अंतर्गत तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले. सदर तक्रार निवारण दिनाच्या कार्यक्रमात एकुण १७८९ अर्जदारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्ष १३६३ अर्जदार सदर तक्रार निवारण दिनाच्या कार्यक्रमाला हजर होते. तसेच ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक व इतर पोलीस अधिकारी उपस्थित होते. तक्रार निवारण दिनाच्या संदर्भात ठाणे पोलीस आयुक्तालयातील १२१९ अर्जाची तात्काळ अर्जदारांच्या समक्ष निर्गती करण्यात आली व इतर अर्जदारांनाही बोलावून घेऊन त्यांच्याही शंकाचे निरसन करण्याचे नियोजित करण्यात आले आहे. ठाणे शहर पोलिसांनी अर्जदारांना प्रत्यक्ष बोलावून जागच्या जागी शंकाचे निरसन व कृती केल्याने अर्जदारांनी व नागरिकांनी समाधान व्यक्त करून ठाणे शहर पोलीसांचे विशेष आभार व्यक्त केले.

# वडगाव सावताळ सोसायटीच्या चेअरमनपदी शिवाजी रोकडे



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वडगाव सावताळ विविध कार्यकारी सेवा सोसायटीची नुकतीच पदाधिकारी निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये सोसायटीच्या चेअरमन पदी बिनविरोध शिवाजी सुभाष रोकडे यांची निवड झाली. सेवा सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब दाते यांनी राजीनामा दिल्या नंतर ही निवड प्रक्रिया लागली होती.


सहकार क्षेत्रामध्ये सोसायटी हा महत्त्वाचा घटक मानला जातो. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे राजकारण होऊ नये. यासाठी गावातील सर्व गट तट एकत्र येऊन शिवाजी रोकडे यांना बिनविरोध चेअरमन करण्यात आले. निवडीनंतर शिवाजी रोकडे यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

यावेळी सरपंच संजय रोकडे, माजी सरपंच राजेंद्र रोकडे, माजी चेअरमन कर्ण रोकडे, माजी चेअरमन दादाभाऊ रोकडे, संचालक पंढरीनाथ व्यवहारे, माजी चेअरमन बाबासाहेब दाते, गो.या. रोकडे, सविता भोसले, संदीप व्यवहारे, संदीप रोकडे, भाऊसाहेब दाते, खंडू कोळेकर, प्रतीक लोळगे,

सखाराम भोबाळ, सुभाष करगळ, बाळासाहेब नरवडे, सचिन जांभळकर, सचिन रोकडे, राजेंद्र भोसले उपस्थित होते.

खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने सरपंच संजय रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऐनवेळी दादाभाऊ रोकडे, संचालक पंढरीनाथ व्यवहारे, माजी चेअरमन बाबाजी दाते गो.या. रोकडे, संचालिका सविता भोसले या सर्व निलेश लंके गटाच्या संचालकांनी व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या संचालकांनी शिवाजी रोकडे यांना पाठिंबा दिल्याने चेअरमनपदाचा मार्ग मोकळा झाला.

## रामराव चौदंते यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील अशोका नगर येथील रहिवासी का.रामराव नारायण चौदंते यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ जुलै २०२५ रोजी दु: खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय वर्ष ६९ होते. त्यांच्यावर अंतिम संस्कार दिनांक १४ जुलै २०२५ रोजी शहरातील बौद्ध स्मशानभुमित दुपारी २ वाजता करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुलं एक मुलगी, नातू असा मोठा परिवार आहे. प्रकाश चौदंते यांचे ते मोठे बंधू होते.